माहितीचा अधिकार

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये
प्राप्त झालेले व्दितीय अपील
अपील क्रमांक : ९८३/२०१९, ९८४/२०१९ व ९८५/२०१९

अपिलार्थी, श्री.काशिराम रुंजाजी चंदाने,
रा.महेंद्र कॉलनी, खरैया नगर, व्ही.एम.व्ही.कॉलेजच्या मागे, राममंदीर जवळ, अमरावती

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा प्र.कृषि अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, अकोट, ता.अकोट, जि.अकोला.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, अकोट, ता.अकोट, जि.अकोला

व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २७.०६.२०२४

अपीलकर्ता : उपस्थित
जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| व्दितीय अपील क्र. | मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| ९८३/२०१९ | २४.१०.२०१८ | -- | २६.११.२०१८ | ०९.०१.२०१९ |
| ९८४/२०१९ | ०२.११.२०१८ | -- | ०३.१२.२०१८ | ०९.०१.२०१९ |
| ९८५/२०१९ | ०२.११.२०१८ | -- | ०३.१२.२०१८ | ०९.०१.२०१९ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक २४.१०.२०१८** रोजी १ व दि.०२.११.२०१८ रोजी २ असे एकूण ३ माहितीचे अर्ज सादर केले असून त्यात त्यांनी अनुक्रमे खालील प्रमाणे माहिती मागितली आहे.

(१) व्दितीय अपील क्र.९८३/२०१९ यात " आपले कार्यालयात श्री.आर.एम.तायडे, सहायक अधिक्षक या पदावर असुन कार्यालयात येण्याची राईट टाईम/वेळ कोणती व जाण्याची वेळ कोणती तसेच त्यांच्या हजेरी पटाच्या रजिष्टरची झेरॉक्स, आपले कार्यालयात रुजु झाल्यापासून ते दि.२४.१०.२०१८ पर्यंत हजेरी रजिष्टरच्या झेरॉक्स प्रती, तसेच श्री.तायडे रुजु झाल्यापासून त्यांनी केलेल्या कामाचे विवरणासह व मंजुर दौरा दैनंदीनी ची माहिती" मागितलेली आहे.

(२) व्दितीय अपील क्र.९८४/२०१९ यात " तालुका कृषि अधिकारी, अकोट, ता.अकोट, जि.अकोला यांचे अधिनस्त येत असलेले कृषि सहायक श्री.तळोकार, सौ.करवते, सौ.मोहोड, फे.क.मारे, श्री.मांजरे, श्री.डाबेराव, श्री.अरकराव, श्री.ठाकरे, श्री.डांगे, श्री.चव्हाण, श्री.सोनोने, सौ.इंगळै, श्री.गरबळे, श्री.चरंवदे,



राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय अमरावती विभाग, अमरावती सत्यमेव जयते

सौ.भासकर, श्री.मसने, श्री.मिसाळ यांनी जलयुक्त शिवार योजनेंतर्गत केलेली कामे, सिमेंट बंधारा, शेततळे, इतर केलेल्या कामाचे व गावाचे नावे वर्णनासह" माहिती मागितली आहे.

(३) द्वितीय अपील क्र. ९८५/२०१९ यात " तालुका कृषि अधिकारी, अकोट, ता.अकोट, जि.अकोला यांचे अधिनस्त येत असलेले मंडळ क्र.३ मधील श्री.सुरेंद्र अंभोरे, कृषि पर्यवेक्षक तथा मंडळ अधिकारी, मंडळ क्रं.२ मधील श्री.वानखडे व मंडळ क्र.१ मधील श्री.पांडे, कृषि पर्यवेक्षक तथा मंडळ कृषि अधिकारी यांनी जलयुक्त शिवार योजने अंतर्गत केलेली कामे, सिमेंट बंधारा , मातीचे बांध, ढाळीचे बांध, शेततळे, नालाखोलीकरण, व इतर कामाचे सविस्तर विवरणासह " माहिती मागितली.

सदर माहिती अर्जानुसार जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत अपीलार्थीस कोणताही प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. त्यानंतर अपिलार्थी यांनी व्यथित होवून **दिनांक २६.११.२०१८ रोजी १ व दि.०३.१२.२०१८ रोजी २ असे एकूण ३ प्रथम अपील अर्ज** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे " माहिती मिळाली नाही " असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपीलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक ०९.०१.२०१९ रोजी सुनावणी घेऊन "अर्जदार यांनी मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी संबंधित मंडळ कृषि अधिकारी, कृषि सहायक यांचेकडून माहिती प्राप्त करुन घेवून आदेशाच्या दिनांकापासून आठ दिवसाचे आत विनाशुल्क अर्जदारास पुरवावी. उपरोक्त आदेश पारित करुन सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे." असे नमूद करुन आदेश पारीत केले.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक ०८.०४.२०१९ रोजी** " माहिती दिली नाही " असे कारण नमूद करून ३ द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक २७.०६.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.संतोष तांदळे व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी श्री.ए.के.शिंदे हे उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, अपिलकर्ता श्री.काशीराम रुजाजी चंदाने यांनी दाखल केलेल्या दि.२४.१०.२०१८ व दि.०२.११.२०१८ रोजी दाखल केलेल्या जोडपत्र-अ च्या अनुषंगाने तत्कालीन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयामध्ये अपिलकर्ता यांना कार्यालयीन अभिलेखामध्ये उपलब्ध असलेली माहिती प्रदान करण्याविषयी स्वयंस्पष्ट निर्देश जारी केलेले आहे. मात्र वरील आदेशाचे अनुपालन झाले नसल्याचा आक्षेप नोंदवित प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज श्री.चंदाने यांनी दि.०८.०४.२०१९ रोजी दाखल केलेले आहेत. प्रस्तुत प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी याआधिच सकारात्मक आदेश पारित केले असून, त्याचे अनुपालन प्रस्तुत आदेश प्राप्त होताच २ आठवड्याच्या आत करण्याचे निर्देशासह तसेच वरील आदेशाचे अद्यापही अनुपालन न करणारे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द कलम १९ (८) (ग) व २० (१) नूसार अधिकतम शास्ती कार्यवाही का करण्यात येवू नये ? याबाबतचा स्वयंस्पष्ट लेखी खुलासा प्रस्तुत आदेश प्राप्त झाल्यापासून दोन आठवड्याच्या आत आयोगास सादर करावा.

## अंतरिम आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पारित केलेल्या आदेशाचे तात्काळ अंमलबजावणी करुन तसा अनुपालन अहवाल प्रस्तुत आदेश प्राप्त झाल्यापासून दोन आठवड्याच्या आत आयोगास सादर करावा.

२. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी पारित केलेल्या आदेशाचे अनुपालन न करण्यास जे तत्कालीन जन माहिती अधिकारी जबाबदार आहेत त्यांचेविरुध्द कलम १९ (८) (ग) व २० (१) अन्वये अधिकतम शास्ती कार्यवाही का करण्यात येवू नये ? याचा स्वयंस्पष्ट लेखी खुलासा प्रस्तुत आदेश प्राप्त झाल्यापासून दोन आठवड्याच्या आत आयोगास सादर करावा.

राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : २७.०६.२०२४**
जावक क्रमांक 4023 दिनांक 15 JUL 2024

निर्गमित केले
15 JUL 2024